स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

जुलै २०२५



## “ठेववृद्धी”

### मासाची उत्साहात सुरुवात

पतसंस्थेच्या मासिकाच्या नावीन्यपूर्ण कल्पनेचे स्वागत

# ‘स्वरूप सहकार’चे प्रकाशन; सभासदांकडून स्वागत; ठेववृद्धी मासाचाही उत्साहात प्रारंभ

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे मुखपत्र म्हणून सुरू करण्यात आलेल्या ‘स्वरूप सहकार’ या मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते १९ जून २०२५ रोजी झाले. या मासिकाच्या ई-बुकचेही या वेळी प्रकाशन झाले. मासिकाचा अंक सभासदांना दिल्यावर त्यांनी आवर्जून तो वाचला आणि या संकल्पनेचे स्वागत केले. २० जून ते २० जुलै या कालावधीतील ठेववृद्धी मासालाही दर वर्षीप्रमाणे चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याचीच ही चित्रमय झलक...** (वृत्त पान क्रमांक चारवर)


‘स्वरूप सहकार’चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन


‘स्वरूप सहकार’च्या ई-बुकचे प्रकाशन



‘स्वरूप सहकार’चा पहिला अंक उत्सुकतेने वाचणारे ग्राहक




ठेववृद्धी मासातील प्रथम ठेवीदारांचे स्वागत - १) पुणे शाखा, २) रत्नागिरी मुख्य शाखा, ३) पावस शाखा

## संपादकीय

# सहकारातून आर्थिक विकास आणि राष्ट्रकार्यदेखील...!

'स्वरूप सहकार' मासिकाचा दुसरा अंक सभासद ग्राहकांसमोर सादर करताना मनस्वी आनंद होतोय. पहिल्या 'स्वरूप सहकार'चे सभासदांनी उत्स्फूर्त स्वागत केले. अनेक प्रतिक्रिया पोहोचल्या आणि त्या स्नेहपूर्ण प्रतिक्रियांच्या वर्षावात अक्षरशः न्हाऊन निघालो.


ठेववृद्धी मासाची दणदणीत सुरुवात झाली आहे. ठेव महोत्सवात ठेवीदारांना भेटताना नवी उमेद प्राप्त होते आहे. या वर्षीच्या ठेववृद्धी महोत्सवाला अपेक्षेपेक्षा काकणभर सरसच प्रतिसाद प्राप्त होतोय. पहिल्या तेरा दिवसांत १२ कोटी ५६ लाख रुपयांच्या ठेवी नव्याने जमा झाल्या. हा प्रतिसाद मन हरखून टाकणारा आहे. या ठेववृद्धी मासाचे वैशिष्ट्य अधिक सुखावते. या वेळेला ५० हजार ते तीन लाख रुपयांदरम्यानच्या खूप ठेवी येत आहेत. स्वाभाविकच ठेवीदारांची संख्या वाढती आहे. याचा अर्थ असा, की स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था अधिक व्यापक प्रतिसाद मिळवती होते आहे.

आधीच जाहीर केल्याप्रमाणे, यंदाचा ठेववृद्धी मास राष्ट्रकार्याला समर्पित आहे. राष्ट्रप्रेमाची प्रखर भावना प्रत्येक भारतीयाच्या मनात आहे. सहकारी चळवळसुद्धा राष्ट्रीय भावनेचा सन्मान करते. भारताची संरक्षण दले आणि त्यांनी बजावलेल्या देदीप्यमान कामगिरीपुढे नतमस्तक होतानाच आपल्या अर्थकारणातून ठरावीक निधी या संरक्षण खर्चासाठी योगदान म्हणून देणे, ही स्वरूपानंद पतसंस्थेसाठी गौरवांकित होण्यासारखी बाब आहे. जेवढे ठेवीदार संस्थेत ठेव ठेवतील, त्या प्रत्येक ठेवीदाराच्या मागे २५० रुपयांप्रमाणे होणारी रक्कम संस्था सैन्य सहायता निधीला प्रदान करणार आहे. संस्थेच्या स्वतःच्या सोशल वेल्फेअर निधीतून ही रक्कम सैन्य सहायता निधीत अर्पण केली जाणार आहे. सभासदांच्या ठेव खात्यातून किंवा व्याजातून ही रक्कम कापली जाणार नाही. ठेवीदार, कर्जदार, सर्व सभासद यांच्या सहयोगातून संस्था अर्थकारण करते. त्यातून नफा होतो. या नफ्यामधून सामाजिक बांधिलकीसाठी निधी निर्माण करणं कायद्यानुसार आवश्यक असतं. त्यानुसार त्या निधीमधून सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून, आपल्या सर्व सभासदांनी परस्पर सहकार्यातून चालवलेल्या या यशस्वी अर्थसंस्थेचे योगदान म्हणून हा निधी राष्ट्रकार्याला दिला जाणार आहे. ठेववृद्धी मास संपल्यानंतर एकत्रित रकमेचा धनादेश शासकीय यंत्रणेमार्फत संरक्षण मंत्रालयाकडे सुपूर्द केला जाईल. सहकार चळवळीत फार मोठी ताकद सामावलेली आहे. सहकार चळवळीमधून भांडवल निर्मितीही मोठ्या प्रमाणावर करता येते, हे स्वरूपानंद पतसंस्थेने आपल्या उदाहरणातून सिद्ध केले आहे. सहकारातील ही ऊर्जा राष्ट्रासाठी सकारात्मक मार्गाने वापरता येण्यासाठीचे हे छोटेसे योगदान ठरेल; पण हा संस्कार महत्त्वाचा आहे. आजपर्यंत जे ठेवीदार संस्थेकडे विश्वासाने ठेव गुंतवत आले आहेत त्या आणि नव्याने गुंतवणूक करणार आहेत अशा सर्वांना पतसंस्थेच्या माध्यमातून या राष्ट्रीय कार्यात सहभागी होता येणार आहे.

हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आहे. सहकाराची महती, सहकाराची उपयुक्तता नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. सहकार या विषयातील प्रबोधनपर काही उपक्रम शाळांमधून राबवण्याचे नियोजन करत आहोत. आपल्या नजीकच्या शाळांमध्ये या संदर्भातील कार्यक्रम होऊ शकतो. आपणही या प्रबोधन कार्यक्रमास उपस्थित राहिलात, तर खूप आनंद होईल.

पावसाळा सुरू झाला आहे. त्या अनुषंगाने वृक्षारोपणाचा कार्यक्रमही स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था लवकरच राबवणार आहे. आपण राहता त्या भागात हा वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यासाठी आपणही पुढाकार घेऊन या उपक्रमात सहभागी होऊ शकाल. आपण आपल्या नजीकच्या शाखेत संपर्क साधलात, तर याबाबत अधिक माहिती प्राप्त होऊ शकेल.

संस्थेचा ठेववृद्धी मास खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या प्रत्येक सभासदाने किमान एक हजार रुपये आणि त्या पटीत कितीही रक्कम आपल्या स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या ठेव योजनांमध्ये गुंतवावी. स्वरूपानंद पतसंस्था प्रत्येक ठेवीदाराच्या स्वागतासाठी सदैव आसुसलेली आहे. या ठेव महोत्सवानिमित्ताने सर्व सभासदांनी आपल्या नजीकच्या शाखेत आवर्जून वेळ काढून भेट द्यावी, असेही आवाहन सर्वांना या माध्यमातून करत आहे.



**- ॲड. दीपक म. पटवर्धन**
अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
संपादक, स्वरूप सहकार

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक स्वरूपानंद प्रिंटिंग सर्व्हिसेस, लांजा येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२ येथे प्रसिद्ध केले.

**जुलै २०२५. पाने १६. संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर.

**मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मुखपृष्ठ :** प्रहर महाकाळ. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स.

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२. संपर्क : (०२३५२) २२१२६३/२९५३६३.

**वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com.

**This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Swaroopanand Printing Services, Lanja and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri-415612. Editor: Adv. Deepak Manohar Patwardhan. Executive Editor: Aniket Konkar. July 2025.**





# ‘स्वरूप सहकार’ मासिकाची संकल्पना नावीन्यपूर्ण

## प्रकाशन सोहळ्यात रवींद्र चव्हाण यांचे कौतुकोद्‌गार

**रत्नागिरी :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे मुखपत्र म्हणून सुरू करण्यात आलेल्या ‘स्वरूप सहकार’ या मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते १९ जून २०२५ रोजी पार पडले. या मासिकाच्या ई-बुकचेही या वेळी प्रकाशन झाले. एखाद्या सहकारी पतसंस्थेने सभासदांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी मासिक सुरू करण्याची संकल्पना नावीन्यपूर्ण असल्याचे सांगून, चव्हाण यांनी कौतुक केले. ‘स्वरूप सहकार म्हणजे जनसंचयातून धनसंचय करणाऱ्या विश्वासार्ह संस्थेचे मुखपत्र असून, संस्थेच्या निर्णयांसह अनेक महत्त्वाच्या बाबी सभासदांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे मासिक सुरू करण्यात आले आहे,’ अशा शब्दांत पतसंस्थेचे अध्यक्ष आणि ‘स्वरूप सहकार’चे संपादक ॲड. दीपक पटवर्धन यांनी यामागची आपली भूमिका मांडली.

या वेळी ॲड. दीपक पटवर्धन यांनी गणेश प्रतिमा देऊन रवींद्र चव्हाण यांचा सत्कार केला. चव्हाण यांनी ॲड. पटवर्धन यांच्याकडून मासिकाविषयी आणि पतसंस्थेच्या विविध उपक्रमांविषयी सविस्तर माहिती घेतली आणि शुभेच्छा दिल्या. ‘स्वामी स्वरूपानंद पतसंस्था दीर्घ काळ सातत्याने वर्धिष्णू व्यवहार करत आली आहे. विश्वासार्ह स्थान असलेली ही विशाल संस्था नावीन्यपूर्ण उपक्रम आणि विविध योजना राबवत असते. या सगळ्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उद्देशाने ‘स्वरूप सहकार’ हे मासिक प्रकाशित करण्याचा निर्णय पतसंस्थेची प्रतिमा संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवण्याचे काम प्रभावी पद्धतीने करील,’ असे प्रशंसोद्गार रवींद्र चव्हाण यांनी या वेळी काढले.

दर वर्षीप्रमाणेच यंदाही २० जून ते २० जुलै या कालावधीत पतसंस्थेचा ठेववृद्धी मास असून, त्याचे औचित्य साधून ठेववृद्धी मासाच्या पूर्वसंध्येला मासिकाचे प्रकाशन करण्यात आल्याचे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘आर्थिक शिस्त सातत्याने पाळून स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने विश्वासार्ह प्रतिमा तयार केली आहे. ३४ वर्षांच्या प्रवासात अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठताना नवीन टप्प्यांचा वेध घेत स्वरूपानंद पतसंस्थेने आपले अर्थविश्व विस्तारले. आर्थिक संस्थेला अपेक्षित असलेली प्रमाणबद्धताही संस्थेने सातत्याने राखली. केवळ १० हजारांच्या भांडवलावर सुरू झालेले हे अर्थचक्र आज ६०० कोटींच्या संमिश्र व्यवसायापर्यंत पोहोचले आहे. पतसंस्थेचा हा प्रवास ग्राहक सभासदांपर्यंत योग्य पद्धतीने मांडण्याची गरज जाणवू लागली. म्हणून ‘स्वरूप सहकार’ हे मासिक सुरू करण्याचा निर्णय घेतला. संस्थेची उद्दिष्टे, उपक्रम, महत्त्वाचे निर्णय, आर्थिक गोषवारा, आर्थिक स्थितीबद्दल सहकारतज्ज्ञांची मते, शासनाची परिपत्रके या बाबी ग्राहक सभासदांपर्यंत पोहोचवण्यासाठी दुवा म्हणून ‘स्वरूप सहकार’ हे मासिक काम करील. तसेच, एखाद्या आर्थिक संस्थेची आर्थिक स्थिती कशी ओळखावी, याबद्दल जागरूकता तयार करण्याचे कामही यातून केले जाईल.’

या प्रकाशन कार्यक्रमाला स्वरूपानंद पतसंस्थेचे उपाध्यक्ष माधव गोगटे, संचालक प्रसाद जोशी, व्यवस्थापक मोहन बापट, उपव्यवस्थापक हेमंत रेडीज, ‘स्वरूप सहकार’चे कार्यकारी संपादक अनिकेत कोनकर, रवींद्र चव्हाण यांचे स्वीय सहायक अनिकेत पटवर्धन, चार्टर्ड अकाउंटंट शैलेश काळे, ‘कोकण मीडिया’चे संपादक प्रमोद कोनकर, आल्हाद मयेकर, राजन होतेकर, सुमुख घाणेकर, डॉ. डिंगणकर, गौरांग आगाशे, मंगेश गांधी, प्रवीण लाड, विनीत भट, अशोक शेट्ये, आनंद लिमये, रूपेश साळवी, नितीन देवरूखकर आदी मान्यवरांसह पतसंस्थेचे ठेवीदार, सभासद उपस्थित होते.

---



यंदाच्या ठेववृद्धी मासातील प्रथम खातेदार धीरज काटदरे यांना प्रमाणपत्र देताना चिपळूणचे शाखाधिकारी केतन ढवळीकर.

# यंदाच्या ठेववृद्धी मासाची दणदणीत सुरुवात

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेववृद्धी मासाला ग्राहकांचा दर वर्षीच चांगला प्रतिसाद मिळतो. यंदाही ती परंपरा कायम आहे. २० जून रोजी ठेववृद्धी मासाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या १३ दिवसांत १२ कोटी ५६ लाख रुपयांच्या ठेवी नव्याने जमा झाल्या आहेत. ३० जून या एकाच दिवशी दोन कोटी चार लाख रुपयांच्या उच्चांकी ठेवी जमा झाल्या. ‘ही आकडेवारी ठेवीदारांची संख्या वाढत असल्याची निदर्शक आहे. हा प्रतिसाद सुखावणारा असून, दर वर्षीप्रमाणेच यंदाही मोठ्या प्रमाणावर ठेवी या महिन्यात जमा होतील, असा विश्वास वाटतो. स्वामी स्वरूपानंद पतसंस्था म्हणजे गुंतवणुकीचा विश्वासार्ह, सुरक्षित आणि आकर्षक पर्याय असून, अधिकाधिक ग्राहकांनी स्वरूप अर्थपरिवारात सहभागी व्हावे, तुमच्या स्वागतासाठी आम्ही सज्ज आहोत,’ असे आवाहन ॲड. पटवर्धन यांनी केले आहे.

# ग्राहक सभासदांना अध्यक्षांनी लिहिलेलं पत्र...!



सस्नेह नमस्कार.

'स्वरूप सहकार' मासिकाच्या या दुसऱ्या अंकाच्या माध्यमातून स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या सभासदांशी संवाद साधण्यासाठी या पत्राचं प्रयोजन केलं आहे. स्वरूपानंद पतसंस्थेच्या ग्राहक सभासद संख्येत झपाट्याने वाढ होताना दिसते. प्रारंभीची केवळ ३०० सभासदांची संख्या आता ४७ हजारांच्या पलीकडे पोहोचली आहे. सभासदांच्या संलग्नतेमुळे स्वरूपानंद पतसंस्थेचा जनाधार व्यापक होत गेला. ४७ हजार सभासदांना सहकार सूत्रात गुंफून स्वरूपानंद संस्थेचं अर्थविश्व मोठ्या दिमाखात अर्थकारण करत आहे. हे अर्थकारण आहे विश्वासार्ह आर्थिक सेवा देण्याचं... ग्राहक सभासदाला स्वरूपानंद पतसंस्थेशी संलग्न करून घेताना स्वरूपानंद पतसंस्था ग्राहक सभासदाला उत्तम विश्वासार्ह आर्थिक सेवा देण्याबद्दल आश्वस्त करते. आणि या आश्वासनपूर्तीतूनच तुम्हा ग्राहक सभासदांशी संस्थेचं एक अनामिक दृढ नातं निर्माण झालं आहे, हे आपल्या सर्वांनाच जाणवतं. स्वरूपानंद पतसंस्था आपल्या सर्वांसाठी नक्कीच खूप आत्मीयतेचा विषय असणार आहे.

गेली ३४ वर्षं स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या प्रत्येक स्पंदनाशी मी जोडला गेलोय. बाल्यावस्थेत असलेल्या संस्थेपासून आता करोडोंचे व्यवहार करणारी अग्रमानांकित संस्था या सर्व प्रवासाचा मी सक्रिय साक्षीदार आहे. स्वरूपानंद पतसंस्थेशी हे नातं दृढ आहेच; तसंच स्वरूपानंद पतसंस्थेचे ग्राहक सभासद म्हणून तुमच्या सर्वांशीही एक अनामिक नातं जोडलं गेलंय. हे नातं आहे विश्वासाचं, हे नातं आहे आर्थिक शिस्तीचं, हे नातं आहे प्रामाणिकपणाचं! जसजसा काळ पुढे सरकतोय, तसतसं हे नातं अधिकाधिक दृढ होतंय. स्वरूपानंद पतसंस्थेने गेल्या ३४ वर्षांत जी प्रगती केली, तिचा परामर्श घेतला, तर असं स्पष्ट जाणवतं, की पतसंस्थेच्या अर्थकारणात कमालीचं सातत्य राहिलं. सहकारी संस्थांची निर्मिती नफेखोरीसाठी झालेली नाही हा गाभा लक्षात घेतला पाहिजे. नफेखोरी करायची नाही म्हणजे नफा होताच कामा नये, असं गृहीतक धरून चालणार नाही. संस्थेकडे संकलित होणारा पैसा त्याचं नियोजन करून तो पूर्णांशाने प्रमाणबद्धता राखत विनियोगात आणला आणि योग्य पद्धतीने वितरित केलेल्या कर्जांची नियमित वसुली होईल हे पाहिलं, की उत्पन्नात वाढ होतेच आणि अंतिमतः नफा होतोच. अर्थकारण उपयुक्त पद्धतीने चालवायचं असेल, तर आर्थिक व्यवहारातून नफा व्हायलाच पाहिजे. अन्यथा ते अर्थकारण यशस्वी आहे असं म्हणता येत नाही. हे तत्त्व जाणून स्वरूपानंद पतसंस्थेने सातत्याने पैशांचा सर्वोत्तम विनियोग केला, कर्जवसुली विक्रमी ठेवली. त्यामुळे स्वाभाविकच वाढता नफा हा संस्थेचा स्थायीभाव झाला आणि याच नफ्यातून विविध बाह्यदेयता नसलेले निधी गठित करून मोठा स्वनिधी स्वरूपानंद पतसंस्थेने निर्माण केला. ४८ कोटी रुपयांचा स्वनिधी हे संस्थेच्या उत्तम आर्थिक स्थितीचं द्योतक आहे.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे व्यवहार वाढवत नेताना आमच्यामागे कोणीही गॉडफादर नव्हता. समोर आलेल्या परिस्थितीनुरूप निर्णय करून अर्थकारण गतिमान ठेवण्याचं उद्दिष्ट ठेवून पूर्ण क्षमतेने केलेलं काम हाच यशाचा राजमार्ग ठरला. आता ३४ वर्षांचा अनुभव गाठीशी आला; पण जमा असलेलं भागभांडवल व्यवसायासाठी वापरायचं असतं की भागभांडवल स्वतंत्र गुंतवून ठेवायचं, हा प्रश्न पहिल्या दिवशी पडला होता. त्या वेळी केवळ १० हजार रुपयांचं भागभांडवल होतं. आता खेळतं भांडवल ४०० कोटी रुपयांच्या पलीकडे गेलं आहे. पहिला चेक लिहिताना खूप गोंधळलो होतो. आठ हजारांचा चेक लिहिताना तीन चेक फुकट गेले होते; मात्र आज दिवसाला किती कोटींचे व्यवहार चेक, एनईएफटी, आरटीजीएस आदींमार्फत होतात हे पाहिलं, की पहिला आठ हजारांचा चेक आठवतो. तो तीन वेळा चुकलेला चेकच मनात कुठे तरी होता. आता नवीन तंत्रज्ञानाच्या युगात संस्थेच्या प्रधान कार्यालयातले चेक प्रिंट होऊन येतात. ते हाती लिहावे लागत नाहीत. या गोष्टी आता किती छोट्या वाटतात; पण त्या वेळी सुरुवात होती, शिकायचं होतं. त्या वेळी आठ हजार रुपयांच्या कर्जाचा चेक लिहितानासुद्धा खूप सावधगिरी बाळगण्याची आणि लक्ष केंद्रित करण्याची सवय लागली. त्यातूनच आजच्या अचूक आर्थिक सेवांचा कित्ता गिरवला गेला, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

छोट्या छोट्या व्यवहारांतून संस्थेला आताचं विशाल स्वरूप प्राप्त झालंय. प्रत्येक पायरीवर स्वतःला सिद्ध करत वाटचाल केली आहे. 'वेडेपणा चाललाय' अशा नकारात्मक प्रतिक्रियाही सुरुवातीला भरपूर प्राप्त झाल्या होत्या; पण मुळात असलेली आवड या नकारात्मक प्रतिक्रियांमुळे व्रतस्थ होत गेली आणि स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था हे माझ्या जीवनाचं मिशन कधी झालं, हे माझं मलाही कळलं




*नाही. आता लाखो रुपयांचे व्यवहार लीलया होतात; पण सुरुवातीच्या काळात दोन हजार रुपयांचं कर्ज द्यायचं झालं, तरी नियोजन करावं लागे. पैसे जमा करण्यासाठी १० ठिकाणी मिनतवाऱ्या करत फिरायला लागे. त्यातूनच पिग्मी योजना सुरू झाली. रोज काही रक्कम हातात येऊ लागली. या पिग्मी प्रतिनिधींमुळे पतसंस्थेची बाजारात ओळख होऊ लागली. रोजची रक्कम जमा होऊ लागली आणि त्यामुळे कर्जवितरणाचा वेग थोडा वाढवता आला; पण पिग्मीचा हिशेब ही नवी डोकेदुखी सुरू झाली. रोज रजिस्टर भरायचं, पासबुकं भरायची, त्यानुसार नोंदी करायच्या. सगळं जुळलं पाहिजे याचा दबाव रोज असे. पिग्मी खाती रोज वाढत होती. हळूहळू रत्नागिरी शहराची वेस ओलांडून जाकादेवी, हातखंबा, गणपतीपुळे, पावस, पाली, खंडाळा इत्यादी गावांमध्येही पिग्मी कलेक्शन सुरू झालं. मोठी रक्कम जमा होऊ लागली; पण पिग्मी मध्येच मोडून खातेदार खात्यात जमा झालेली रक्कम परत मागत असत. त्यामुळे खूप जागृत राहावं लागे. कोणाची मागणी पूर्ण करायची राहणार नाही, याची काळजी घ्यावी लागत होती. हजारो खाती सुरू झाल्याने त्यांच्या हिशेबाच्या नोंदी, हिशेब जुळवणी इत्यादी कामं वाढत गेली. त्याच कालखंडात तंत्रज्ञानाचा वापर करून पिग्मी एजंटना मशीन दिलं आणि मशीनद्वारे पिग्मी गोळा करणारी स्वामी स्वरूपानंद ही पहिली संस्था झाली. त्याच दरम्यान हिशेबाच्या कामकाजात संगणक प्रणालीचा वापर करण्याचा निर्णय आम्ही घेतला आणि त्यानंतर संपूर्ण सीबीएस प्रणालीचा वापर कार्यालयीन कामात सुरू केला. सीबीएस प्रणालीमुळे व्यवहारात गतिमानता आली, अचूकता आली आणि त्याबरोबरच अधिक पारदर्शकता आली. संस्थेच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य धोरणात्मक निर्णय घेण्याचा कटाक्ष ठेवल्याने संस्थेचं एक वेगळं रूप समोर आलं. सतत उपक्रमशील असणारी, नवतंत्रज्ञान स्वीकारणारी, आर्थिक आकडेवारी सातत्याने घोषित करणारी संस्था अशी ओळख निर्माण करण्यात संस्थेला यश आलं.*

*पिग्मी योजना यशस्वी झाली. त्यामुळे संस्था लोकांपर्यंत आणि प्रामुख्याने व्यापारी वर्गात पोहोचली. त्याच वेळी २० स्थानिक युवकांना उत्तम रोजगारसंधीही उपलब्ध झाली. संस्थेकडचा खेळता पतपुरवठा वाढला. स्वाभाविकच कर्जवितरण गतिमान झालं. कर्जांची आकडेवारी वाढू लागली. वसुली यंत्रणा तंदुरुस्त ठेवल्याने वितरित कर्जांची वसुली नियमित होत गेल्याने अर्थचक्र गतिमान होत गेलं.*

*कर्जांची वाढती मागणी लक्षात घेऊन आणि दीर्घ मुदतीच्या निधीची गरज लक्षात घेऊन संस्थेने पिग्मी ठेव योजनेबरोबरच मुदत ठेवी संकलित करण्यावर भर दिला. जनमानसात संस्थेची प्रतिमा निर्माण होत असताना ही प्रतिमा अधिक प्रभावी बनवण्यासाठी ठेव योजना साह्यभूत ठरल्या. ठेव संकलनासाठी तुम्हा सभासद-ग्राहकांकडे संपर्क दौरे केले. ठेवीदारांना संस्थेची माहिती देऊन ठेव योजना आणि संस्थेचं तंदुरुस्त अर्थकारण समजावून देऊन ठेवीदारांना ठेव ठेवण्यासाठी उद्युक्त केलं. त्या वेळी सभासद-ठेवीदारांशी निकटचा संवाद आणि संपर्क झाला. त्यातूनच स्नेहाचं नातं तयार झालं. हे सभासदांबरोबरचं नातं आज ३४ वर्षांनंतरही अतूट राहिलं आहे. या ठेव संकलनाच्या प्रयत्नांची पुढची पायरी ठरला तो ठेववृद्धी मास. सर्वदूर संपर्क साधून ठेव संकलनाचं उद्दिष्ट ठरवून ठेववृद्धी मासाची घोषणा करायला सुरुवात केली. पाहता पाहता २० जून ते २० जुलै हा ठेववृद्धी मास आपल्या ठेवीदारांच्या पक्का लक्षात राहिला. गोळप, हातखंबा, गावखडी, पावस, आडिवरे, गणपतीपुळे, जाकादेवी, चाफे, मालगुंड, खंडाळा, नांदिवडे, रीळ, बसणी, नेवरे अशी कित्येक गावं या ठेववृद्धी मासामुळे माहिती झाली. या गावातल्या सभासदांशी संपर्क वाढला. त्यातून ठेवसंकलनाचे कार्यक्रम झाले. दिवस ठरवून ठेव संकलनासाठी या गावांतल्या सन्माननीय सभासद साथीदारांबरोबर गावात फिरून ठेव संकलित करताना जो उत्साह वाटे, जो आनंद असे आणि जे समाधान मिळे, त्याचं वर्णन शब्दांत करता येणार नाही. ग्रामस्थ सभासद एकमेकांना हाकारे देत, टोपणनावाने हाका मारत. प्रत्येक घरात मौल्यवान ठेवींबरोबर चहा, दूध, प्रसंगी पोहे याचा आग्रही प्रसाद घेत दिवस कधी संपे हे कळत नसे. या संवादामुळे संस्थेची माहिती सर्वदूर पोहोचली. तसंच, ठेव जमा करतानाच या संवादातून माणसंही जोडली गेली. त्या वेळी घेतलेले कष्ट, केलेला प्रवास यातून मोठी भांडवलनिर्मिती झाली. प्रत्येक ठेववृद्धी मासानंतर संस्थेचा प्रवास कोटींचे टप्पे पार करत पुढे चालला. ठेवसंकलनातून पतनिर्मिती झाल्याने नवनवीन कर्ज योजना, वाढीव कर्जमर्यादा, सोनेतारण कर्ज योजना या माध्यमातून संस्थेचं अर्थकारण ५० कोटींचा टप्पा पार करतं झालं. ठेवींनी २०१३मध्ये ५० कोटींचा टप्पा ओलांडला. आर्थिक संस्थेला व्यवहारांचं रहाटगाडगं सतत एकसमान गतीने फिरत ठेवता यायला हवं. त्यासाठी पैशांचं नियोजन हवं. येणारा पैसा, वितरित*

*होणारा पैसा, होणारा खर्च यांचं त्रैराशिक व्यस्त असताना नये, ही खूणगाठ मनाशी बांधून पैसा उभा करण्याचा खर्च आणि कर्ज वितरणाचा दर यातील समन्वय साधण्याचं गुपित अनुभवाने अंगवळणी पडलं. स्वानुभवातून हे दर ठरवत असल्याने आपणा ठेवीदारांनाही हे दर नेहमीच योग्य वाटले आणि ठेवीदारांनी ठेव दर स्वीकारून सातत्याने मोठ्या ठेवी पतसंस्थेत ठेवल्या. पत उभारणीचा खर्च, त्यानुसार कर्जावर घ्यायचा व्याजदर याचा समन्वय ठेवत चांगले कर्जदार संस्थेकडे कर्जासाठी येतील असा प्रयत्न संस्थेला अधिक यश देऊन गेला. कर्जदाराची पतक्षमता, विश्वासार्हता आणि कर्ज कशासाठी हवं आहे ते कारण या सगळ्याचा अभ्यास करून कर्ज मंजूर करण्याचं धोरण संस्थेच्या यशाला कारणीभूत ठरलं.*

*अर्थकारणात शिस्तीला, वक्तशीरपणाला, नेटक्या नियोजनाला महत्त्व असतं. अचूकताही अत्यंत गरजेची असते. उपलब्ध निधी पाडून (आयडल) न ठेवता तो पूर्णांशाने विनियोगात आणण्याचं सूत्र महत्त्वाचं ठरतं. आपल्याकडच्या निधीचा सर्वोत्तम कार्यक्षम विनियोग केला, तर उत्तम उत्पन्न प्राप्त करून त्यात नफाही प्राप्त करता येतो. कर्जावर किफायती व्याजदर ठेवूनही सर्वोत्तम निधीविनियोगाचं सूत्र वापरून लाभ कमावता येतो, हे स्वरूपानंद पतसंस्थेने ३४ वर्षांत सातत्यपूर्ण निव्वळ नफा मिळवून प्रस्थापित केलं.*

*स्वरूपानंद पतसंस्थेच्या प्रत्येक स्पंदनाशी, प्रत्येक निर्णयाशी, प्रत्येक ध्येयाशी मी बांधला गेलो असल्याने प्रत्येक टप्प्यावर उचित निर्णय घेण्याची सवय अनुभवातून लागली. २००३ सालापासून विस्ताराचं धोरण स्वीकारून शाखा प्रारंभ सुरू झाला. पावसपासून सुरू झालेला शाखांचा प्रवास आता १७ शाखांपर्यंत पोहोचला आहे. प्रत्येक शाखा उत्तम व्यवहार करते आहे. प्रत्येक शाखा ही स्वतंत्र संस्था म्हणून काम करू शकेल, या क्षमतेचं अर्थकारण स्वरूपानंद पतसंस्थेच्या सर्व शाखा करत आहेत. शाखा विस्ताराकडेही प्रारंभी हास्यास्पद नजरेने पाहिलं गेलं; पण आपण नेमकं काय करतोय याची पूर्ण जाणीव असल्याने शाखाविस्ताराचं धोरणही यशस्वी ठरलं. तालुका कार्यक्षेत्रापासून राज्य कार्यक्षेत्रापर्यंतची मजल आणि १७ शाखांचा विस्तार यामुळे स्वरूपानंद पतसंस्था ही लोकमान्यता पावलेली संस्था म्हणून जगासमोर आली.*

*२०१२ साली महाराष्ट्र सरकारने राज्यातल्या केवळ १३ संस्थांना पुरस्कार दिला. त्या १३ संस्थांमध्ये 'सहकार भूषण' हा पुरस्कार स्वरूपानंद संस्थेने पटकावला होता. त्यानंतरही अनेक पुरस्कार संस्थेला सातत्याने प्राप्त होत राहिले. ते पुरस्कार संस्थेच्या उत्तम कामाचा दाखला देत राहिले आहेत.*

*स्वरूपानंद पतसंस्थेचा ३४ वर्षांचा हा अर्थप्रवास आणि या प्रवासात संस्थेशी जोडले गेलेले तुम्ही सर्व ग्राहक सभासद यांच्या एकजिनसी सहकार प्रवासामुळे स्वरूपानंद पतसंस्थेचं विशाल स्वरूप जगासमोर आलं. सहकार चळवळीतला हा प्रवास स्वरूपानंद पतसंस्थेच्या सर्व घटकांसाठी अभिमानाचा आहे. स्वरूपानंद पतसंस्थेकडे आजवर २४ हजार ठेवखाती आणि १९ हजार कर्जखाती आहेत. इतक्या मोठ्या संख्येने सभासदांना आर्थिक सेवा देणारं स्वरूपानंद हे शक्तिशाली केंद्र झालं आहे. सहकारातली ही प्रतिमा, हा प्रवास अवघ्या महाराष्ट्रातल्या सहकार चळवळीचं लक्ष वेधून घेणारा ठरला आहे.*

*या 'स्वरूप सहकार' मासिकाच्या माध्यमातून सर्व सभासदांशी संवाद साधावा, संस्थेचं अर्थकारण, संस्थेची बलस्थानं, कार्यपद्धती, आलेले अनुभव, नव्या योजना याबाबत ऊहापोह करावा या उद्देशाने हे पत्र सभासद ग्राहकांना प्रस्तुत केलं आहे.*

*तुम्हा सर्वांच्या पाठबळावर गेली २४ वर्षं संस्थेचा अध्यक्ष म्हणून, त्याआधी १० वर्षं संचालक कार्यवाह म्हणून मी कार्यरत आहे. कायद्याचा अभ्यासक म्हणून, सहकार क्षेत्रातला वकील म्हणून, सहकारी संस्थांमधला सक्रिय कार्यकर्ता म्हणून, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संचालक म्हणून, राज्य फेडरेशनचा कार्याध्यक्ष म्हणून मी कार्यरत आहे. जिथे जिथे कार्यरत आहे, त्या प्रत्येक संस्थेचा स्वरूपानंद पतसंस्थेसाठी पूर्णांशानै उपयोग करून घेण्यात मी कोणतीही कसर सोडली नाही. स्वामीकृपा आणि सभासदांच्या सदिच्छा यांमुळे प्राप्त झालेल्या ऊर्जेमुळे आजपर्यंत घेतलेला प्रत्येक निर्णय अचूक ठरला, राबवलेला प्रत्येक उपक्रम प्रचंड यशस्वी ठरला. हे कार्य पूर्ण क्षमतेने आणि व्रतस्थ वृत्तीने करण्याची क्षमता आणि बुद्धी स्वामीकृपेने साथ देत राहावी आणि स्वरूपानंद पतसंस्थेचा हा अर्थप्रवास अधिकाधिक तेजाळत राहावा. सर्वांचं सहकार्य, स्नेह सातत्याने मिळत राहावा, हीच प्रार्थना.*


*सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!*

**- ॲड. दीपक म. पटवर्धन**


***■ अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ■ संपादक, स्वरूप सहकार***

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची 2021 ते 2025 या कालावधीतील आर्थिक स्थिती

| ठेवी |
|---|
| २०२०-२१ - ₹ २२६ कोटी ३१ लाख |
| २०२१-२२ - ₹ २५० कोटी ३१ लाख |
| २०२२-२३ - ₹ २६५ कोटी ७ लाख |
| २०२३-२४ - ₹ ३०८ कोटी ८० लाख |
| २०२४-२५ - ₹ ३४६ कोटी २१ लाख |




| गुंतवणूक |
|---|
| २०२०-२१ - ₹ १०१ कोटी ६९ लाख |
| २०२१-२२ - ₹ ११९ कोटी ६९ लाख |
| २०२२-२३ - ₹ १३१ कोटी ६ लाख |
| २०२३-२४ - ₹ १५० कोटी ६८ लाख |
| २०२४-२५ - ₹ १४९ कोटी ३३ लाख |





| स्वनिधी |
|---|
| २०२०-२१ - ₹ २७ कोटी तीन लाख |
| २०२१-२२ - ₹ ३१ कोटी ८५ लाख |
| २०२२-२३ - ₹ ३६ कोटी ८४ लाख |
| २०२३-२४ - ₹ ४२ कोटी ४२ लाख |
| २०२४-२५ - ₹ ४८ कोटी १३ लाख |




# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची 2021 ते 2025 या कालावधीतील आर्थिक स्थिती

| निव्वळ नफा |
| --- |
| २०२०-२१ - ₹ ५ कोटी ७० लाख |
| २०२१-२२ - ₹ ६ कोटी २१ लाख |
| २०२२-२३ - ₹ ६ कोटी ६१ लाख |
| २०२३-२४ - ₹ ७ कोटी ३ लाख |
| २०२४-२५ - ₹ ८ कोटी ३२ लाख |




| वितरित केलेली कर्जे |
| --- |
| २०२०-२१ - ₹ १५९ कोटी ३ लाख |
| २०२१-२२ - ₹ १७० कोटी ५१ लाख |
| २०२२-२३ - ₹ १८२ कोटी १ लाख |
| २०२३-२४ - ₹ २१५ कोटी १० लाख |
| २०२४-२५ - ₹ २५२ कोटी ६४ लाख |




| कर्जवसुलीची टक्केवारी |
| --- |
| २०२०-२१ - ९९.७५% |
| २०२१-२२ - ९९.५१% |
| २०२२-२३ - ९९.६१% |
| २०२३-२४ - ९९.५३% |
| २०२४-२५ - ९९.७१% |



# पहिल्या कर्मचाऱ्याच्या नजरेतून पतसंस्था...



एखादा वटवृक्षाचा विस्तार जसा खूप मोठा असतो, तसा दर्जा आज स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने प्राप्त केला आहे. या सगळ्याचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या निःस्पृहपणे काम करण्याच्या पद्धतीला आहे. मी गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात शिक्षण घेत असताना आणि भारतीय जनता पक्षाचे काम करत असताना माझी श्री. पटवर्धन साहेबांशी ओळख झाली. त्या वेळी मला नोकरीची नितांत आवश्यकता होती. पटवर्धन साहेबांमुळे मला पतसंस्थेत नोकरी मिळाली. १९९२ साली मी पतसंस्थेचा पिग्मी एजंट म्हणून काम करू लागलो. त्या वेळी रत्नागिरी शहरातील टिळक आळीतील वसंत विहार संकुलातील भाजपच्या कार्यालयात पतसंस्थेचे कार्यालय होते. तेव्हा अकाउंटंट सौ. सोमण मॅडम आणि मी पिग्मी एजंट असे दोन कर्मचारी होतो. रत्नागिरी शहरात तेव्हा पतसंस्थेकडून प्रथमच पिग्मी योजना सुरू करण्यात आली होती. पटवर्धन साहेबांचा नावलौकिक मोठा आहे. त्यांचा जनसंपर्क वाखाणण्याजोगा आहे. त्यांच्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या ओळखींचा उपयोग मला मोठ्या प्रमाणावर खातेदार मिळवण्यासाठी झाला. त्यांनी संपर्क साधला, की समोरच्या व्यक्तीकडून नकार यायचाच नाही. त्यांच्या आणि संस्थेच्या संचालक मंडळाच्या हातोटीमुळे आज पतसंस्थेचे रूपांतर वटवृक्षामध्ये झाले आहे. पटवर्धन साहेबांच्या नेतृत्वाखाली समर्पित वृत्तीने कार्य केल्यामुळेच आज पतसंस्था नावारूपाला आली आहे.

१९९५ साली महाराष्ट्र शासनाची तलाठी भरती झाली, त्या वेळी माझी त्यात निवड झाली. खरे सांगायचे तर मला स्वतःला या नव्या नोकरीच्या ठिकाणी हजर न होता पतसंस्थेतच कार्यरत राहावे, असे मनापासून वाटत होते. परंतु शासकीय नोकरी लागल्याने घरच्यांनी लावलेल्या तगाद्यामुळे नाईलाजास्तव मी ती नवी नोकरी स्वीकारली आणि संगमेश्वर तालुक्यात तलाठी या पदावर रुजू झालो. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत असताना मी केलेल्या कामकाजाचा आणि तिथे असताना तयार झालेल्या जनसंपर्काचा मौलिक उपयोग मला शासकीय सेवेत काम करताना झाला. अलीकडेच म्हणजे फेब्रुवारी २०२५मध्ये मी मंडळ अधिकारी (उपजिल्हाधिकारी कार्यालय, भूसंपादन-कोकण रेल्वे, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी) या पदावरून सेवानिवृत्त झालो.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला पटवर्धन साहेबांच्या रूपाने परीसस्पर्श लाभला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्थेने अलीकडेच रत्नागिरी शहरात मोक्याच्या ठिकाणी स्वमालकीची जमीन घेतली आणि त्या ठिकाणी इमारतीचा भूमिपूजन सोहळा पार पडला. हा एक सुवर्णक्षण आहे. अध्यक्षांसह सर्व संचालक मंडळाने अथकपणे, निःस्पृहपणे आणि पारदर्शकतेने काम केल्यामुळे ठेवीदार कितीही मोठी ठेव या पतसंस्थेत ठेवताना निर्धास्त असतात. ठेवीची मुदतपूर्ती कधी होणार आहे, हे एक वेळ कदाचित ठेवीदार विसरू शकतील. परंतु पतसंस्थेतून ठेवीच्या मुदतपूर्तीच्या एक महिना आधीच ठेवीदाराला एसएमएस पाठवला जातो. अशा प्रकारे संस्थेने स्थापनेपासूनच विश्वास जपला आहे. मी स्वतःदेखील पतसंस्थेचा ठेवीदार आहे. पतसंस्थेच्या कार्यालयाच्या व्यवस्थापकांसह सर्व कर्मचारी अतिशय विनम्रपणे सेवा देत असतात. त्यांनादेखील मनःपूर्वक धन्यवाद!

पतसंस्थेची अशीच उत्तरोत्तर भरभराट होवो, अशी सदिच्छा!

**- धनंजय चवंडे**

## संस्था उत्तरोत्तर यशाचे शिखर गाठेल



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ही अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या कष्टाने आणि कौशल्याने एक प्रगतिशील संस्था म्हणून नावारूपाला येत आहे. मी आणि माझे कुटुंबीय २०१२पासून संस्थेचे सभासद आहोत. संस्थेचा कर्मचारीवर्ग अत्यंत सुस्वभावी, मृदुभाषी, तसेच प्रत्येकाशी सहकार्याच्या भावनेने वागणारा आहे. सध्याची 'स्वरूप सहकार' मासिकाची संकल्पना छान आहे. आमची पतसंस्था दीपक पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली उत्तरोत्तर यशाचे शिखर गाठत जाईल याची खात्री आहे.

**- आल्हाद गोपीनाथ मयेकर**, सभासद

## स्तुत्य कल्पना

'स्वरूप सहकार' मासिक हा अतिशय सुंदर आणि स्तुत्य उपक्रम आहे. पतसंस्थेच्या सर्व सभासदांना आणि ग्राहकांना त्याद्वारे सर्व माहिती मिळेल. पतसंस्थेच्या कार्याचा आढावा घेता येईल. 'स्वरूप सहकार' हे खऱ्या अर्थाने पतसंस्थेचे मुखपत्र ठरेल.

**- डॉ. सुधीर रा. परांजपे,**
धाऊलवल्ली, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी (खातेदार)

## आणखी एक सकारात्मक पाऊल

'स्वरूप सहकार' हे मासिक म्हणजे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे आणखी एक सकारात्मक पाऊल आहे. सभासदांप्रति असलेल्या दायित्वाची ती जणू पावतीच आहे. वर्षानुवर्षे आम्ही कुटुंबीय आपल्या संस्थेशी जोडलेले आहोत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. पतसंस्थेचा पारदर्शी व्यवहार, तसेच सभासद आणि समाजाप्रति संस्थेचा असलेला सकारात्मक दृष्टिकोन आणि लाभलेलं उत्तुंग नेतृत्व आपल्या या संस्थेला आणखीही खूप मोठ्या उंचीवर नेऊन ठेवणार आहे, याबद्दल आम्ही सभासद निश्चिंत आहोत. पतसंस्थेच्या उपक्रमांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**- आनंद लिमये, रत्नागिरी**

# माणूसपण न हरवता काम करणारी विश्वासार्ह पतसंस्था



गेली जवळजवळ वीस वर्षे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेशी माझा जवळचा संबंध आहे. कर्ज घेण्यापासून ठेवी ठेवण्यापर्यंतच्या वेगवेगळ्या भूमिकांमधून मी पतसंस्थेत जातो आहे. पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्याशी व्यक्तिगत पातळीवर आणि अध्यक्ष म्हणूनही स्नेह आणि जवळीक आहे. त्यांना वेळोवेळी भेटणे हा तर एक आनंदाचाच भाग असतो; पण याचबरोबर पतसंस्थेची काउंटरवरची सेवाही खूप उत्तम आहे. तेथील कर्मचारी पतसंस्थेत आलेल्या माणसांकडे कधीही दुर्लक्ष करत नाहीत. प्रत्येकाशी आल्या आल्या आपुलकीने संवाद साधतात. सर्व्हिस सेक्टर म्हणजेच सेवा क्षेत्रातील संस्थांमध्ये ग्राहकाच्या सेवेची संस्कृती असली पाहिजे, तिचा अनुभव या पतसंस्थेत घेता येतो. ग्राहकांच्या मदतीसाठी त्या कर्मचाऱ्यांचा हात कायम पुढे असतो. नेमकी कोणत्या प्रकारची सेवा हवी आहे, कोणती माहिती हवीय किंवा संस्थेकडून काही सर्टिफिकेट वगैरे लागणार आहे का, अशा सगळ्या गोष्टी हे कर्मचारी खूप आपलेपणाच्या भावनेने विचारतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ग्राहकाला जे हवे असते, ते लगेच देतात. त्यासाठी त्याला हेलपाटे मारायला लावण्याचा त्यांचा दृष्टिकोन नसतो. पतसंस्थेचे कार्यालयही मला आवडते. कारण आत गेल्या गेल्या तेथील व्यावसायिकता मनात भरते. तिथल्या फर्निचरपासून एकंदर वातावरणापर्यंत सगळ्या गोष्टी मनाला भावतात. कर्मचाऱ्यांशी व्यक्तिगत ओळख निर्माण होते. त्यांना कधी फोनवर काही विचारले, तरी लगेच माहिती देतात. 'प्रत्यक्ष या, मग माहिती सांगतो,' असे कोणीही सांगत नाही.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात अनेक नव्या बँका, आर्थिक संस्था येत आहेत. असे असतानाही एखादी पतसंस्था समाजामध्ये आपले स्थान मिळवते, तिथे ठेवीदार येतात आणि विश्वासाने ठेव ठेवतात, ही मी मोठी गोष्ट समजतो. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा यूएसपी म्हणजे प्रचंड विश्वासार्हता. ही संस्था व्यावसायिक पद्धतीने चालवली जाते, व्यावसायिक पद्धतीने निर्णय घेते, ठेवीदारांच्या हिताबद्दल प्रचंड दक्ष आहे. ही संस्था चांगल्या दराने व्याज देते, ज्येष्ठ नागरिकांना ठेवींवर अधिक व्याजदर मिळतो, हा भाग चांगला आहेच; पण आपण ठेवलेला पैसा अतिशय सुरक्षित आहे. आपल्याला तो ठरलेल्या वेळीच परत मिळणार आहे, ही पतसंस्थेची विश्वासार्हता अतिशय उत्तम आहे. त्याकरिता संस्थेचे कौतुक केलेच पाहिजे. ॲड. पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण टीम अतिशय समर्पित आणि व्यावसायिक पद्धतीने काम करते. व्यवसाय करत असतानाही त्यांनी माणूसपण न हरवता आपले काम उभे केले आहे, त्याकरिता त्यांचे जितके अभिनंदन करावे तितके थोडेच आहे. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या सर्व उपक्रमांसाठी माझ्या खूप खूप शुभेच्छा!

**- सुहास विद्वांस,** निवृत्त केंद्र प्रमुख,
आकाशवाणी रत्नागिरी

# नव्या उद्योजकांवर विश्वास ठेवून पाठबळ देणारी संस्था



रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेशी आम्ही कुटुंबीय ठेवीदार म्हणून गेली अनेक वर्षे जोडलेले आहोत. उत्तम सेवा देणारी विश्वासार्ह पतसंस्था असा आमचा अनुभव आहे. पाच वर्षांपूर्वी मी कर्जदार या नात्यानेही पतसंस्थेशी जोडला गेलो. त्यावेळचा अनुभव उद्योग क्षेत्रात अर्थसाह्य मिळवण्यासाठी धडपडणाऱ्यांना आवर्जून सांगावा असा आहे. 'अनबॉक्स युवर डिझायर' हा नवा स्टार्टअप उद्योग मी पाच वर्षांपूर्वी रत्नागिरीत सुरू केला. रत्नागिरीसारख्या शहरात खाद्यपदार्थांची घरपोच डिलिव्हरी सेवा ही नवी कल्पना राबवायची होती. त्यासाठी पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक स्कूटर्स खरेदीकरिता कर्ज घेण्यासाठी आम्ही अनेक बँकांमध्ये गेलो; मात्र कोणीही आमच्या या कल्पनेसाठी कर्जरूपाने साह्य केले नाही. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेकडे गेल्यावर मात्र आम्हाला चकित करून टाकणारा अनुभव आला. ॲड. दीपक पटवर्धन यांनी आमच्या कल्पनेवर आणि आमच्यावर विश्वास टाकला, त्या कल्पनेचे महत्त्व ओळखले आणि आवश्यक त्या नियमांची पूर्तता केल्यानंतर १९ लाख रुपयांचे कर्ज झटपट मंजूर केले. त्यामुळे आम्ही इलेक्ट्रिक स्कूटर्स घेऊ शकलो आणि ही नावीन्यपूर्ण कल्पना नावीन्यपूर्ण पद्धतीने राबवू शकलो. नुकतीच या उपक्रमाला पाच वर्षे पूर्ण झाली. आमच्या सेवेला प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत आहे. आम्ही डिलिव्हरी सेवांच्या सोबत प्लास्टिक-इलेक्ट्रॉनिक कचरा संकलन आणि अन्यही अनेक उपक्रम राबवत आहोत. हे सारे आमच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे शक्य होत आहे. नव्या उद्योजकांना मार्गदर्शन करण्याची संधी मला जेव्हा मिळते, तेव्हा मी आवर्जून स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा संदर्भ त्यांना देतो. स्थानिक पातळीवर असे पाठबळ मिळणे ही गोष्ट उद्योग करू पाहणाऱ्यांसाठी खूपच मोलाची आहे. पतसंस्थेला खूप शुभेच्छा!

**- गौरांग आगाशे,** युवा उद्योजक, रत्नागिरी

# वाखाणण्याजोगे उपक्रम

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा 'स्वरूप सहकार' अंक मिळाला. आपल्या पतसंस्थेची जबरदस्त प्रगतीकडे चाललेली वाटचाल खरेच कौतुकास्पद आहे. ९९ टक्क्यांहून अधिक कर्जवसुली, गेल्या वर्षी नफ्याने ओलांडलेला आठ कोटी रुपयांचा टप्पा, या वर्षीचा ठेववृद्धी मास राष्ट्रप्रेमाला समर्पित करण्याची योजना हे सारे नक्कीच वाखाणण्याजोगे आहे. आपल्या शाखेतील आपुलकीने वागणारे आपले अधिकारी आणि कर्मचारी या सर्वच बाबी अभिनंदनीय आहेत. यापुढेही आपली घोडदौड अशीच यशस्वीरीत्या चालू राहावी, म्हणून खूप खूप शुभेच्छा!

**- नारायण ठाकूर, नाटे,**
ता. राजापूर, जि. रत्नागिरी (खातेदार)

## पतसंस्था परिवारातील
# जुलै महिन्यातील वाढदिवस!
## सर्वांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!



**केतन दिलीप ढवळीकर**
२७-०७-१९७७
शाखाधिकारी, चिपळूण शाखा



**विवेक सुरेश पाटील**
प्रशासन अधिकारी, मुख्य शाखा
१२-०७-१९७७



**श्रीगणेश सूर्यकांत नागवेकर**
लिपिक, साखरपा शाखा
३०-०७-१९९२



**सत्यपाल सहदेव मालप**
शिपाई, खंडाळा शाखा
०३-०७-१९९५



**गणेश रमेश सुर्वे**
शिपाई, जाकादेवी शाखा
०६-०७-१९८५



**किशोर विठ्ठल गराटे**
१०-०७-१९८७
शिपाई, कुवारबाव शाखा



**आनंद प्रकाश सावंत**
चालक/शिपाई, मुख्य शाखा
२२-०७-१९९५

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

- **रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३
- **मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४
- **कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९
- **कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११
- **पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४
- **जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९
- **खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९
- **मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८
- **पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०
- **लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३
- **राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३
- **नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८
- **साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४
- **देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०
- **चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

- **देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८


### पुणे जिल्हा

- **कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# ग्राहकांबरोबरच विविध क्षेत्रांतील व्यक्तींपर्यंत पोहोचला 'स्वरूप सहकार'




चिपळूण




देवगड



जाकादेवी




खंडाळा




कुवारबाव




लांजा




नाटे





पाली




पुणे

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेववृद्धी मासात ठेवीदारांचे स्वागत



कुवारबाव शाखा



मारुती मंदिर शाखा



साखरपा शाखा



मालगुंड शाखा



पाली शाखा



पावस शाखा




राजापूर शाखा




लांजा शाखा




राजापूर शाखा

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेववृद्धी मासात ठेवीदारांचे स्वागत


देवगड शाखा


देवरूख शाखा


जाकादेवी शाखा


खंडाळा शाखा


कोकणनगर शाखा



मारुती मंदिर शाखा


मारुती मंदिर शाखा


नाटे शाखा

# ठेव वृध्दी मास
## 20 जून ते 20 जुलै 2025

■ स्वरूपांजली ठेव ● 12 ते 18 महिने

**8.50 %**
(सर्वसाधारण)




(ज्येष्ठ नागरिक/महिला)

■ सोहम ठेव योजना
19 ते 36 महिने
मासिक व्याज

**8.25 %**
(सर्वसाधारण)

**8.50 %**
(ज्येष्ठ नागरिक/महिला)



आमच्या विश्वासार्ह व आकर्षक ठेवयोजनांमध्ये
गुंतवणूक करून निश्चिंत व्हा !
– ॲड. दीपक पटवर्धन (अध्यक्ष)

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
मो. नं. 9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com